# ।। भर्म बिधुंस को अंग ।।
# मारवाडी + मराठी
# सत्संग

महत्वाची सुचना:– रामद्वारा जळगांव यांचे असे निदर्शनास आले आहे की,काही रामस्नेही शेठ साहेब राधाकिसनजी महाराज व जे.टी.चांडक यांनी अर्थ केलेल्या वाणीजी रामद्वारा जळगांव मधून घेऊन जातात व आपल्या वाणीजीचा गुरु महाराज सांगतात तसा पुर्ण आधार न घेता आपल्या मताने समजने,अर्थामध्ये परस्पर बदल करुन टाकतात तरी वाणीजी घेऊन गेलेल्या कोणत्याही संताने परस्पर अर्थामध्ये बदल करु नये.काहीही बदल करायचा वाटत असल्यास रामद्वारा जळगांवशी संपर्क साधावा व नंतर बदल करावा.

✻ वाणीजी आमच्याकडून जशी पाहिजे तशी चेक झालेली नाही,चेक करायला भरपूर वेळ लागतो.आम्ही परत चेक करुन पुन्हा लोड करुन देऊ.याला वर्षभर तरी लागेल. तुमच्या समजण्यापुरता कामात येईल,यासाठी आम्ही वाणीजी वाचण्याकरीता लोड करुन दिली आहे.

## ।। अथ भर्म बिधुंस को अंग लिखंते ।।

।। कुंडल्यो ।।

मन की ब्रम्हा सिव कहे ।। मन की क्हे औतार ।।
मन की केहे सिकोत्री ।। क्हे अनसोया नार ।।
क्हे अनसोया नार ।। पूँछ प्राक्रम सब सारा ।।
आठ सिध्ध नौ निध ।। जके क्रता की लारा ।।
सुखराम कहे केवळ नही ।। जां को क्हां बिचार ।।
मन की ब्रम्हा सिव कहे ।। मन की कहे अवतार ।।१।।

जे साधु कधी न पाहिलेल्या अनोळखी स्त्री–पुरुषांच्या मनातील गोष्ट जाणतात ते साधु मोक्षाला गेले आहे व त्याच्या शरणात गेल्याने निश्चितच मोक्ष मिळतो.मोक्ष मिळण्यात काही संदेह राहत नाही.असे जगातील स्त्री–पुरुष समजतात.यावर आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,ब्रम्हा,विष्णू,महादेव,शक्ती हे सर्व प्रत्येकाच्या सगळ्यांच्या मनातील गोष्ट जाणतात तसेच हे अवतार ही दुसऱ्याच्या मनातील गोष्ट जाणतात.चौऱ्यांशी लक्ष योनीमध्ये सिकोत्री पक्षी आहे.तो टिटवी पक्षी संसारात लाखो कोस दूरवर होणारी घटना पाहू घेते व स्त्री–पुरुषाच्या मनातील जाणते व आपल्या आवाजात जगाला सांगते.ज्याला तिची भाषा समजते ते ती काय सांगत आहे.हे समजून घेतात.ब्रम्हाचे पुत्र अत्री ऋषीची पत्नी अनुसया ही पण दुसऱ्यांच्या मनातील गोष्ट जाणत होती म्हणून काम कपट घेऊन आलेले सासरे ब्रम्हा,विष्णू,महादेवच्या मनातील गोष्ट जाणून त्यांना तिने आपल्या सत्तच्या बळावर सहा सहा महिन्याचे बालक बनवून दिले व आपले पतिव्रतपण अखंडीत ठेवले तर असे तीन लोक १४ भवनापर्यंत सर्व पराक्रम व पोहच अनेकांमध्ये आहे.होनकाळ पारब्रम्ह तर अष्टसिध्दी व नऊनिधीचा उत्पत्ती कर्ता आहे.ह्या सर्व सिध्द्या त्यांच्या पराक्रमाने चालतात. आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,दुसऱ्याच्या मनातले ओळखून घेणे, लाखो कोसावर काय होऊन राहिले आहे हे पाहणे अष्ट सिध्दी व नऊ निधीचे अनेक चरित्र चमत्कार करणे या विध्यांमध्ये मायेचे सुख आहे केवलचे खरे सुख नाही यांच्यात केवलचे सुख आहे हे समजणे भ्रम आहे खोटा विचार आहे.याकारणाने या कोणत्याही विधीचा शरण घेतल्याने मोक्ष मिळत नाही.मोक्ष तर राम राम रटून घटात केवळ प्रगट केल्यावरच मिळतो.असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगून राहिले आहेत. ।।१।।

छंद अर्ध भुंजगी ।।

मिले राज पाटंग ।। मिले सुख खाटंग ।।

मिले बुध भारी ।। मिले सुध सारी ।।
मिले धन सोई ।। नग्र सेट होई ।।
बिणा राम रटणा ।। सबे झूट कुवाई ।।
मिले सुख सारा ।। सोई खाख माई ।।२।।

अष्टसिध्दी नऊ निध्दी साधल्याने राजपाट मिळून राजपाटचे अनेक सुख मिळून जातात परंतु घटात केवल उपजत नाही.मायेचे ज्ञान,ध्यान शिकून जगाच्या बुध्दी पेक्षा उंच बुध्दी व समज बनून जाते.परंतु मोक्ष मिळत नाही.रिध्दी सिध्दींच्या सिध्द्या केल्याने खुप धन प्राप्त होऊन जाते व त्या भरपूर धनाच्या कारणाने नगरशेठ ही बनून जातो व मायेचे खुप सुख लुटतील परंतु घटात केवल नाही प्रगटणार केवल फक्त राम रटल्याने प्रगट होते केवल प्रगट झाल्याशिवाय मोक्ष मिळत नाही म्हणून आवागमणाने दु:ख मिटत नाही म्हणून मायेच्या सर्व विध्या मोक्ष प्राप्तीकरीता खोट्या आहे भ्रम आहे.ह्या सर्व विध्या चौऱ्यांशी लक्ष योनी सोडवित नाही.म्हणून या विध्यांनी प्राप्त झालेले सर्व सुख शरीर सुटल्यानंतर मिळणाऱ्या चौऱ्यांशी लक्ष योनी करीता राख झालेले राहतात. ।।२।।

पढे बेद सोई ।। पडे. पाँव लोई ।।
सबे देव सारा ।। मिले बारम्बारा ।।
चले मन ताँही ।। ज्हाँ चल जाँही ।।
बिना राम रटणा ।। कदे मोख नाही ।।
मिले सुखसारा ।। सोई खाख माही ।।३।।

वेद वाचून चारी वेद कंठस्थ करुन प्रविण ज्ञानी बनून जातो.त्या ज्ञानीला दंडवत नमस्कार करण्याकरीता जगातील ज्ञानी,ध्यानी,नर–नारी तुटून पडतात.त्याला ज्ञानाचे भारी सुख मिळते तरी ही केवल प्रगट झाले नाही म्हणून मोक्षाला जात नाही.तीन लोक,१४ भवनातील सर्व देवी देवता पुन्हा–पुन्हा येऊन भेटतात व साधनेच्या जोरावर आपल्या मनाला जेथे पाहिजे तेथे चालला जातो.परंतु इतका ही पराक्रम प्रगट करुन घेतला व रामनामाचे रटन नाही केले तर त्याला मोक्ष मिळत नाही.तो रामनाम रटन करेल तर त्याच्या घटात केवल प्रगटेल व मग तो कधी गर्भात येणार नाही.रामनाम रटले नाही तर त्याच्या घटात कधी केवळ प्रगटणार नाही व केवल विना ८४ लाख योनीत पडेलच पडेल व आज मिळालेले सर्व सुख ८४ लाख योनीत राख बनून जातील.म्हणून घटात सर्व सुख आहे,धन आहे,धान्य आहे.परंतु आग लागून आगीत भस्म झाल्यावर ते सर्व सुख धन, धान्य राख होऊन जाते व त्या राखेने सुख मिळत नाही.याप्रकारे हे सर्व सुख पुढे राख बनून जातात. ।।३।।

गुणे ब्हो भाँती ।। करे मन खाँती ।।
कहे बात भारी ।। बडे तप धारी ।।
सुझे मन माँही ।। लाखाँ कोस ताँई ।।
बिना राम रटणा ।। कदे मोख नाँही ।।
मिले सुख सारा ।। सोऊ खाख माही ।।४।।

संसारातील सर्व वेग–वेगळ्या प्रकारचे उंच्च व चतुर गुण प्राप्त करतो.मनात उंच्च गुणांची चतुराई ठेवतो.संसाराला चतुराईच्या भारी भारी गोष्टी सांगतो.सहज साधले जाणार नाही असे मोठ मोठे तप करतो.त्याला त्या तपाच्या बळाने लाख कोसापर्यंतची गोष्ट मनात दिसू लागते.इत्यादी भारी भारी अनेक पराक्रम प्राप्त करतो व त्यांच्या पासून उत्पन्न झालेले अनेक सुख भोगतो.परंतु रामनाम कधी रटत नाही.ज्यामुळे महासुखाच्या मोक्षाला कधी पोहचू शकत नाही व ८४ लाख योनीत पडून काळाचे अनंत दु:ख भोगतो.अनेक पराक्रमाचे प्राप्त केलेले सुख ८४ लाख योनीत कामी येत नाही,राख बनून जातात. ।।४।।

म्हारूप पाया ।। सबे लछ आया ।।
रमे पीव संगा ।। करे ख्याल चंगा ।।
दासी संग होई ।। चंपे पाव सोई ।।
बिना राम रटणा ।। कदे मोख नाई ।।
मिले सुख सारा ।। सोई खाख माई ।।५।।

महा रुपवान काया मिळाली सर्व पतिव्रतेचे उत्तम लक्षण मिळाले.पती सोबत अति प्रेमाने रमते व संसारातील सर्व क्रिया करते.चाकरी करण्याकरीता अनेक दास्या आहेत.त्या दास्या हात पाय दाबतात असे अनेक सुख घेते.परंतु रामनाम रटून केवल प्राप्त करीत नाही.केवल न प्राप्त केल्याकारणाने मोक्षात न जाता आवागमनात पडते व आवागमणाचे दु:ख भोगते.अशाप्रकारे संसाराचे सर्व सुख प्राप्त करते.परंतु रामनाम न रटल्याकारणाने मोक्षाचे सुख नाही मिळवू शकत.हे प्राप्त केलेले सुख ही पुढे चालत नाही.राख बनून जातात.।।५।।

गडे ऊड जाई ।। मनो बात पाई ।।
जळे काठ संगा ।। हुवे नाही भंगा ।।
चले नीर सोई ।। सिरे बाट होई ।।
बिना राम रटणा ।। कदे मोख नाही ।।
मिले सुख सारा ।। सोई खाख माही ।।६।।

सिध्दाईच्या बळावर जमिनीत गाडून अनेक कोसावर निघतो.पक्षा सारखा आकाश मार्गाने

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

उडून जातो.दुसऱ्याच्या मनातील गोष्ट समजून जातो.लाकडांमध्ये बसुन स्वत:ला अग्नी लावून देतो.परंतु सिध्दाईच्या जोरावर जरासाही जळून भंग होत नाही.जमिनीवर जग चालते असे पाण्यावर येत जात राहतो.असे सर्व भारी मायेच्या सिध्द्या प्रगट करतो. परंतु मुखाने रामनाम कधी रटत नाही.रामनाम न रटल्याने घटात केवल प्रगटत नाही. केवल न प्रगटल्याकारणाने मोक्षाच्या सुखात पोहचू शकत नाही.जन्म मरणाच्या दु:खाने भरलेल्या फेऱ्यात पडलेला राहतो.प्राप्त केलेल्या सर्व सिध्द्या सुख देऊ शकत नाही. सुख देण्याच्या बेकाम होऊन जातात. ।।६।।

**करे ब्होत सेवा ।। मिले आन देवा ।।**
**सजे जोग सोई ।। अखी जुग होई ।।**
**देवे सिष कूंची ।। चड़े पवन ऊंची ।।**
**बिना राम रटणा ।। कदे मोख नाही ।।**
**मिले सुख सारा ।। सोऊ खाख माही ।।७।।**

केवळ रामाची भक्ती सोडून अन्य देवतांची खुप भक्ती करतो.त्याने केलेल्या देवतांच्या असाधारण भक्तीमुळे त्याला देवता भेटण्यास येतात व करामातचे अनेक सुख देतात. काळापासून वाचण्याकरीता सर्व योगाच्या साधना करतो व काळापासून क्षय होत नाही असा अक्षय होऊन जातो व सोबत आपल्या शिष्यांनाही अक्षय होण्याची कुंची देतो. आपला व शिष्याचा श्वास गगनात भृगुटीत चढवून देतो व युगायुगपर्यंत अखंडीत अमर राहतो.परंतु पुढे काळाच्या मुखातच जातो याने केवल रामाचे रटन केले असते तर तो सदाकरीता अमर होऊन गेला असता किंवा काळाच्या मुखात नाही गेला असता व मोक्ष देशाचे अनंत सुख भोगले असते. ।।७।।

**जबे काळ आवे ।। चड़े गिगन जावे ।।**
**असी बिध पाई ।। सबे सिध आई ।।**
**सुणो सब कोई ।। नवो निध होई ।।**
**केहे सुखरामा ।। बिना सुण स्यामा ।।**
**ब्रथा बिना भक्ति ।। भेष गृह धामा ।।८।।**

जेव्हा काळ पकडायला येतो तेव्हा श्वास चढवून काळ पोहचणार नाही अशा उंचावर भृगुटीमध्ये जाऊन बसतो व रिध्दी सिध्दीच्या विध्या करुन आठी सिध्द्या व नऊ निधीया पदम,महापद्म,शंख,मकर,कच्छप,म्हकुंद,कुंद,नील,बच्छा प्राप्त करुन घेतो. परंतु श्याम म्हणजे केवलची भक्ती करीत नाही म्हणून आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की श्याम म्हणजे केवलच्या भक्तीशिवाय जसे गृहस्थी जीव ८४ लक्ष योनी पडतो तसे हे सिध्दी ही आवागमनात पडून दु:ख भोगतात. ।। ८।।

कवत ।।

हीण पुर्ष जत्त जारे ।। काछ सपने नही खुले ।।
तपसी या सम नाय ।। रूंख बागळ नित झूले ।।
त्यागी श्वान समान ।। जाण जग मे नही कोई ।।
भेड सरोवर अंग ।। फेर गरिबी नही होई ।।
मेना सम बोली नही ।। गुंगे समान नही मून ।।
बिन रटणा सुखराम के ।। मोख पहूँतो कूण ।।१।।

काही ज्ञानी,ध्यानी सिध्द साधु जती बनल्याने काळ सुटेल समजून जतीची कठीण साधना साधून जती बनतात.यावर आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की, नपुसकाचे विर्य स्वप्नात ही सुटत नाही जर जती बनल्याने मोक्ष मिळतो हे समजत असाल तर नपुसक का कुद्रतीच जती आहे.मग तो मोक्षाला का जात नाही.काही ज्ञानी,ध्यानी साधु सिध्द झाडावर उलटे लटकून साधना करतात व काळ कापला जाईल व मोक्ष मिळेल यात राहतात तर आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात झाडावर उलटे लटकल्याने मोक्ष मिळत नाही जर मिळाला असता तर वटवाघूळ झाडावर जन्मताच उलटे लटकते.मग ते वटवाघूळ मोक्षाला का जात नाही?कोणी ज्ञानी, ध्यानी,साध सिध्द मोक्ष मिळेल म्हणून नेहमी उभे राहून तपस्या करतात तर आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,हे झाड जन्मापासूनच एका जागी डोके खाली व पाय वरती करुन उभे आहेत.मग झाडांचा मोक्ष का होत नाही?काही ज्ञानी,ध्यानी, साध सिध्द समजतात.की पूर्ण त्यागी बनल्याने आवागमन मिटते तर आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,कुत्र्यासारखा त्यागी कोणी नाही.तो रुपये पैसे काही जवळ संग्रह करीत नाही.येथपर्यंत की शरीरावर लंगोटी ही ठेवीत नाही.भाकरी ही पोटापेक्षा जास्त त्याच्या समोर टाकली तर तो पोट भरेल इतके खातो व पोट भरल्यावर उरलेली भाकरी सोबत न घेऊन जाता जागेवरच सोडून देतो यावर आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,त्यागी बनल्याने काळ सुटतो तर कुत्र्याचा सुटेल व आजपर्यंत कुत्रा मोक्षाला गेला नाही.मग त्यागी बनणारे साधक मोक्षाला कसे जातील व त्यांचा काळ कसा सुटेल?काही ज्ञानी,ध्यानी,साधु सिध्दी गरीबीचा स्वभाव प्रगट करतात व मोक्ष प्राप्त होईल ही समज बनवितात यावर आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,गरीबीचा स्वभाव प्रगट केल्याने मोक्ष मिळाला असता तर मेंढी, बकरी कुद्रतीच गरीब स्वभावाची आहे.या मेढी,बकरीला कोणी कापले तरीही ही मेंढी, बकरी विरोध करीत नाही गरीब बनून राहते.अशी कुद्रतीच गरीब स्वभावाची मेंढी, बकरी मोक्षाला जात नाही.मग गरीब स्वभावाचा साधु मोक्षाला कसा जाईल.कोणी साधु

समजतात की गोड(मधुर)बोलण्याने मोक्ष मिळतो तर मैना तर जन्मापासून मरेपर्यंत गोड्च वाणी बोलते मग ती मोक्षाला का जात नाही असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात.काही साधु केवल प्रगट करण्याकरीता मौन धारण करतात तर आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की मुका तर कुद्रतीच मौनी आहे.मग तो मुका मोक्षाला का जात नाही व ८४ लक्ष योनीत का दु:ख भोगत भटकतो.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,जती बनल्याने,तपस्वी बनल्याने,त्यागी बनल्याने, गरीबी ठेवल्याने,गोड वाणी बोलल्याने व मौनी बनल्याने मोक्षाला पोहचेल हा साधकांचा भ्रम आहे.मोक्षाला फक्त राम रटल्यानेच पोहचता येते.आता इतर कोणत्याही विधीने पोहचता येत नाही असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले. ।।१।।

**जरणा जमी समान ।। रूंख सम सती न कोई ।।**
**दाता इंद्र समान ।। सिध पारस सम लोई ।।**
**पवन अेकूकार ।। बूत के सम नाय सियाणी ।।**
**लाख कोस की बात ।। बस्त सिकोत्री जाणी ।।**
**अे अंग लछ मत पूँतीया ।। फिर ब्हो तामे होय ।।**
**बिन रटणा सुखराम के ।। मोख न पूँचे कोय ।।२।।**

कोणी साधु समजतो की जरणा म्हणजे सहनशीलता स्वभाव प्राप्त करुन घेतल्याने मोक्ष मिळून जातो तर आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,जमिनीत कुद्रतीच सहनशीलता स्वभाव आहे.(जसे गंगा नदी हा एक हंसाचा देह आहे ज्याच्या देहाचे नाव गंगा आहे.तसेच जमिन ही एक हंसाचा देह आहे.जर जरणा प्राप्त केल्याने हंस मोक्षाला गेला असता तर आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,जमिन ही मोक्षाला जाईल.ती मोक्षाला का जात नाही?काही ज्ञानी समजतात की,सती बनल्याने मोक्ष मिळतो.(सती म्हणजे मागेल ते त्याला देतो)तर आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,वृक्ष हे कुद्रतीच सती आहे.वृक्षाचे फळ घ्या,फुल घ्या,पान घ्या,फांद्या घ्या,साल घ्या,लाकडे घ्या,मुळ्या घ्या म्हणजे त्याच्या देहाचे कोणते ही अंग घ्या तो अंग देऊन देतो,नाही म्हणत नाही असा कुद्रती सती आहे.मग वृक्ष मोक्षाला जातात का?जर वृक्ष मोक्षाला जात नाही तर सती बनणारे सती पुरुष मोक्षाला कसे जातील?कोणी ज्ञानी,ध्यानी,नरनारी समजतात की दाता बनल्याने मोक्षास पोहचता येते आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,इंद्रसारखा जगात कोण दाता आहे.हा इंद्र सर्वांना पिण्याकरीता तसेच अन्न उत्पन्न करण्याकरीता पाणी पुरवितो.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,दाता बनल्याने मोक्ष मिळाला असता तर इंद्र मोक्षाला का नाही पोहचत?काही ज्ञानी,ध्यानी,साधु,सिध्द समजतात की,सिध्दी पुरुष

बनून गेल्याने मोक्ष मिळतो तर आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की, पारस लोखंडाचे किमती सोने बनवून देतो व दरिद्रीची दुःख दरिद्री सदाकरीता नष्ट करुन देतो म्हणजे पारस हा कुद्रतीच सिध्द आहे.सिध्दपुरुष झाल्याने मोक्षास पोहचतो तर पारस मोक्षाला का नाही जात?असे सतगुरु सुखरामजी महाराज विचारतात.काही साधक समजतात की,सर्वांमध्ये एक सारखे राहील्याने(वागल्याने)म्हणजे समभाव आल्याने जीव मोक्षाला पोहचतो.तर आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की, वायु सर्वांमध्ये एकोकार म्हणजे एकसारखा वाहतो.मग वायु मोक्षाला का नाही पोहचत ?कोणी समजतात की,शहाणे बनल्याने म्हणजे कोणी निंदा करेल,कोणी पुजा करेल, कोणी नुकसान पोहचवेल तरीही नाराजी न आणता खुश राहणे असा स्वभाव आल्याने मोक्ष मिळाला असता तर आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले की,मुर्ती सारखे कोण शहाणे आहे मुर्तिची पुजा करा,निंदा करा,नुकसान करा कधी क्रोधीत होऊन बोलत नाही.मग मुर्ति मोक्षाला का नाही पोहचत? कोणी ज्ञानी,ध्यानी समजतात की, लाख कोसावरचा डाव समजण्याचे अवधीज्ञान प्राप्त केल्याने मोक्ष मिळतो तर सिकोत्री पक्षाला लाख कोसाची गोष्ट कुद्रती दिसून जाते.मग सिकोत्री पक्षी मोक्षाला का जात नाही? अशा प्रकारचे स्वभाव लक्षण व मत प्राप्त केल्याने मोक्ष मिळत असता तर अशाप्रकारचे अनेक स्वभाव प्राण्यांमध्ये कुद्रती आहे.मग ८४ लाख योनीचे प्राणी मोक्षाला का जात नाही? आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,प्राणी फक्त रामनाम रटल्यानेच मोक्षाला जातात.जरणा,सती,दाता,सिध्द,समभाव(समान वागणे) शहाणे बनून राहणे,लाख कोसाची गोष्ट ऐकणे इत्यादी स्वभावाने कधीही मोक्षाला जात नाही.या स्वभावाने मोक्षाला जातो हे समजणे हा भारी भ्रम आहे. ।।२।।

**बनमे बास न चीत ।। रोझ हिर्ण्या नित होई ।।**
**मुसो गुफा बणाय ।। सिंह संग रहे न कोई ।।**
**ओऊं घट घट जाण ।। भेष टिल्ली ब्हो कीना ।।**
**निर्मोही नागण होय ।। भंवर बागाँ चित्त दीना ।।**
**अलमस्ता ईजगर रहे ।। अे लछ ब्होता होय ।।**
**बिन रटणा सुखराम के ।। मोख न पूंचे कोय ।।३।।**

कोणी ज्ञानी,ध्यानी नर नारी समजतात की वनात वास करणारे मोक्षाला पोहचले असते तर आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,वनात रोही हरीण सारखे अनेक प्राणी वास करतात.मग हे प्राणी मोक्षाला का नाही पोहचतात? काही साधु सांगतात की,गुफेत राहील्याने मोक्षाला पोहचतो तर उंदिर हा नेहमी गुफेतच राहतो.मग उंदिर मोक्षाला का नाही पोहचत.कोणी म्हणतात की,साधुला एकटे फिरल्याने केवल

उपजते तर आदि सतगुरु सुखरामजी महाराज विचारतात की,सिंह हा एकटा फिरतो.कोणालाही सोबत ठेवत नाही.मग सिंह मोक्षाला का नाही पोहचत?कोणी ज्ञानी,ध्यानी सांगतात की,ओअमची साधना साधल्याने मोक्ष मिळाला असता तर आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,श्वास हा ओहम सोहम अजप्पाचा बनला आहे म्हणून जे जे प्राणी श्वास घेतात त्या सर्व प्राण्यांमध्ये ओअम कुद्रतीच घेतले जाते.मग हे प्राणी मोक्षाला का नाही पोहचत?हे प्राणी मोक्षाला पोहचू शकत नाही तर ओअमचा साधक मोक्षाला कसा पोहचेल?कोणी ज्ञानी,ध्यानी सांगतात की,शरीरावर टिळक लावून साधुचा वारंवार वेगवेगळा वेष बनविल्याने मोक्ष मिळाला असता तर आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,खारीच्यावर कुद्रती व पाण्याने न निघणारे पक्के टिळे लागलेले असतात व तो वारंवार आपला वेष ही बदलतो मग खार मोक्षाला का जात नाही?कोणी ज्ञानी,ध्यानी समजतात की,साधक निर्मोही बनल्याने मोक्ष मिळतो तर नागिण स्वत: जन्म दिलेल्या पिल्लांना खावून जाते.मग नागिण मोक्षाला का जात नाही असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज विचारत आहे.कोणी समजतात की,मोक्ष बाग बगिच्यात रमल्याने मिळतो तर भुंगा चितमनाने बाग बगिच्यातच रात्रंदिवस रमतो. मग भुंगा मोक्षा का जात नाही.कोणी समजते की बेफिकीर निश्चित राहील्याने काळ सुटून जगतो.अजगर आपले भक्ष्य शोधण्याकरीता कोठे ही जात नाही व जवळ आलेले भक्ष्य ही आपणाहून तोंडात आल्या शिवाय खात नाही.तर अजगरासारखा अलमस्त कोण आहे?अलमस्त राहिल्याने कल्याण झाले असते तर अजगराचे होऊन जाते.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,हे लक्षण तर आणखी ही प्राण्यांमध्ये आहे.या लक्षणांनी कोणी ही मोक्षाला जात नाही.मोक्ष तर फक्त राम राम रटल्याने जातो.असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज म्हणाले. ।।३।।

त्रक फ्रक गृह त्याग ।। मद गरिबी बक मूनी ।।<br>
जंगळ रोही गाँव ।। बास क्याँही दिस सुनि ।।<br>
कायर सूरा बहेस ।। बाद ठंडा ब्हो होई ।।<br>
दाता मूंजी ग्यान ।। मुढ मुरख नर लोई ।।<br>
लख चोरांसी जूण मे ।। सबे लछ मत्त होय ।।<br>
बिन रटणा सुखराम के ।। मोख न पूंचे कोय ।।४।।

संसारातून म्हणजे समजून विचार न करता क्रोधात येऊन संसार त्यागणारे असे खुप आहेत.विचारपूर्वक चांगले गृहस्थी जीवन जगणारे गृहस्थी ही खुप आहेत व वेदाच्या वैराग्य ज्ञानाच्या समजने गृहस्थी जीवन त्यागून बनलेले त्यागी ही खुप आहेत.मद

मध्ये येऊन उन्मत झालेले ही खुप आहेत.व्यवहारात साधे सरळ गरीब ही खुप आहेत.अति बोलणारे ही खुप आहेत.नाहीच्या बरोबरीने बोलणारे मौनी ही खुप आहेत.जंगल वनात राहणारे ही खुप आहेत.भर वस्तीत राहणारे ही खुप आहेत.जेथे पक्षी ही भटकत नाही अशा ओसाड जागेवर ही खुप राहतात.युध्दामध्ये घाबरुन पळणारे भित्रे म्हणजे कायर स्वभावाचे ही खुप आहेत.शुरवीर ही खुप आहेत.वाद विवाद करणारे ही खुप आहेत व कसाही वाद असो त्यात शांत राहणारे ही खुप आहेत.संसारात दान देणारे दाता खुप आहेत.तर धन असल्यावर ही स्वत: करीता व स्वत:च्या घराकरीता थोडेही धन खर्च न करणारे खुप आहेत.संसारात चतुर ज्ञानी खुप आहेत.तर मुढमुर्ख ही खुप आहेत.जगात असे अनेक स्वभावाचे व मताचे स्त्री–पुरुष आहेत.या स्वभावाने जीव मोक्षाला गेला असता तर आज सर्व मोक्षाला गेले असते.३ लोक १४ भवनात कोणी दिसले नसते.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,मोक्षात तर जे मनुष्य रामनाम रटन करतील तेच जातील इतर कोणी कशाही स्वभावाचा असला म्हणजे उंच स्वभावाचा असो किंवा निच स्वभावाचा असो मोक्षाला जात नाही ।।४।। ।। इति भ्रम बिधुंसन को अंग संपूरण ।।